**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
भूमी व मिळकत शाखा
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
मुंबई – ४०० ०५१.

भू.वमि.शा./वाहनतळ व फुडकोर्ट/कोविड-१९/भाडे सवलत/२९९/२०२२ दिनांक – २५/०२/२०२२

**: परिपत्रक :**

प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुल, वडाळा भारवाहक तळ, बॅकबे रेक्लमेशन स्कीम तसेच ओशिवरा जिल्हा केंद्र येथे वाहनतळे (बांधीव /मोकळे भुखंड) व फुडकोर्ट यांची निर्मिती करून निविदेद्वारे सदर वाहनतळे व फुडकोर्ट चालविण्यासाठी व देखाभालीसाठी अल्प / दिर्घ मुदतीसाठी भाडयाने / भाडेपट्टीने कंत्राटदारास वितरीत केलेल्या आहेत. तसेच कार्यालयीन जागा अनुज्ञाप्ती करारापवर देण्यात आल्या आहेत. सदर कंत्राटदारांकडून प्राधिकरणांस मासिक, त्रैमासिक व सहामाही स्वरुपात भाडे प्राप्त होते.

२. सन २०२० मध्ये कोविड-१९ या महामारीने संपूर्ण विश्वाला ग्रासले असून ही महामारी भारतात साधारणत: मार्च २०२० मध्ये पोचली. त्यानंतर शासनाने दिनांक २५ मार्च, २०२० ते २४ डिसेंबर, २०२० या टाळेबंदीच्या काळामध्ये दिलेल्या विविध आदेशान्वये सर्व कार्यांना (Activities) स्थगिती दिली असून, त्या दरम्यान काही कालावधीनंतर ठराविक कार्ये (Activities) चालू करण्यास परवानगी दिली होती. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय व त्याआधारे विविध शासकीय संस्थांनी अर्जदारांना दिलेली सवलत इत्यादी बाबींचा सर्वकष विचार करुन प्राधिकरणाच्या वाहनतळ व फुडकोर्ट धारकांना कोविड-१९ च्या कालावधिसाठी सवलत देण्याबाबत, तसेच विलंब कालावधीसाठी आकारावयाचे विलंब व्याजाबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १६/११/२०२१ रोजी पार पडलेल्या १५१ व्या बैठकीतील ठराव क्र. १५८७ नुसार वाहनतळ व फुडकोर्ट संदर्भात तसेच विलंब व्याजाबाबत खालीलप्रमाणे सवलत देण्यास मान्यता देण्यात आली आहे :-

**I. वाहनतळ :-**

| अनु क्र. | कालावधी | शासनाच्या आदेशान्वये परवानगी दिलेली कार्ये | आकारावयाचे अनुज्ञाप्ती शुल्क/भाडे | सुट |
|---|---|---|---|---|
| १. | २५ मार्च, २०२० ते ३१ मे, २०२० | १०० % टाळेबंदी | संपुर्ण माफ | १००% |
| २. | ०१ जुन, २०२० ते ३१ ऑगष्ट, २०२० | १० % उपस्थिती | ५% | ९५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | ०१ सप्टेंबर, २०२० ते २८ फेब्रुवारी, २०२१ | ३० % उपस्थिती | १५% | ८५% |

**II. रेस्टॉरन्ट व फुडकोर्ट :-**

| अनु क्र. | कालावधी | शासनाच्या आदेशान्वये परवानगी दिलेली कार्ये | आकारावयाचे अनुज्ञाप्ती शुल्क/भाडे | सुट |
|---|---|---|---|---|
| १. | २५ मार्च, २०२० ते ३१ मे, २०२० | १०० % टाळेबंदी | संपुर्ण माफ | १००% |
| २. | ०१ जुन, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० | फुडपार्सल सेवा सुरू | ५% | ९५% |
| ३. | ०१ ऑक्टोबर, २०२० ते २८ फेब्रुवारी, २०२१ | ५० % क्षमता | २५% | ७५% |

**III. विलंबाने अदा केलेल्या रक्कमेवरील व्याज :-**

| अनु क्र. | कालावधी | सुट |
|---|---|---|
| १. | दिनांक २५ मार्च, २०२० ते २४ डिसेंबर, २०२० | १००% |

३. सर्व संबंधित विभागांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व भाडेपट्टेदार, अनुज्ञाप्तीधारक, कंत्राटदार यांच्या निदर्शनास आणावे.

४. सदचे परिपत्रक मा. महानगर आयुक्तांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

२५/२/२२

**उप.भू.व मि.व्यवस्थापक,**
**भू.व मि. शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण**

**प्रति,**

१) संचालक (प्रकल्प), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा.
२) संचालक (कामे), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा.
३) संचालक (प्रणाली), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा.
४) प्रमुख, अभियांत्रिकी विभाग.
५) वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग.
६) प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग.
७) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग.

८) प्रमुख, सामाजिक विकास कक्ष.
९) प्रमुख, नियोजन विभाग.
१०) प्रमुख, भूमि व मिळकत शाखा.
११) प्रमुख, नगर नियोजन विभाग.
१२) प्रमुख, भाडेतत्तवावरील घरे योजना.
१३) प्रमुख कर्यान्वयन अधिकारी, मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा.
१४) मुख्य लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग.
१५) सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) माहिती व तंत्रज्ञान कक्ष.
१६) सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
१७) अपर जिल्हाधिकारी तथा प्रकल्प संचालक, वि.प.झो.पु.प्रकल्प.
१८) अपर जिल्हाधिकारी –भूसंपादन व पनुवर्सन शाखा.
१९) कर्मचारी वर्ग , अधिकारी, प्रशासन विभाग,
२०) सचिव कार्यकारी समिती, प्रशासन विभाग.
२१) प्रशासकीय अधिकारी
२२) तहसीलार (आस्थापना), प्रशासन विभाग
२३) विशेष कार्य अधिकारी, एस.आर.ए. कक्ष
२४) वरिष्ठ नियोजक , उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे.
२५) कार्यालयीन आदेश नस्ती.

**प्रत माहितीकरीता सादर :-**

१) मा.महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक.
२) मा.अतिरिक्त महानगर आयुकत /प्रकल्प संचालक यांचे स्वीय सहायक.
३) मा.अतिरिक्त महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक.
४) मा.सह महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक.